शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या
"हातमागावरील कापडाची" दरनिश्चिती

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय,**
**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**
**आदेश क्रमांक.भांखस/हातमाग कापड/दरनिश्चिती/(३२)/२०१८-१९/** क्र ८३५८
**दिनांक.** 26 JUL 2018

**वाचा:- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दि.०१/१२/२०१६.**
**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.३०/०६/२०१८ रोजीचे इतिवृत.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१६ नुसार परिशिष्ट-१९ मधील नमूद हातमागाच्या ११ वस्तूंसाठी महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ (महाटेक्स), मुंबई व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार सदर राखीव वस्तूंचे सन २०१८-१९ साठी दरनिश्चिती करण्यासाठी महासंघ (महाटेक्स)/महामंडळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.३०/०६/२०१८रोजीच्या बैठकीत **"हातमागाचे कापड"** या बाबीचे सन २०१७-१८ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर राखीव उत्पादित बाबीचे निश्चित केलेले दर **परिशिष्ट "अ"** येथील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे आहेत.

महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ (महाटेक्स)/ महामंडळ यांनी त्यांची पुरवठा क्षमता, वस्तूंची नावे, संख्या, नियत किंमत इत्यादीची यादी दरवर्षी ३१मार्च पूर्वी वस्त्रोद्योग विभागाकडून प्रमाणित केल्यावर महासंघ (महाटेक्स) / महामंडळाने ई-पोर्टलवर प्रदर्शित करावी. शासकीय कार्यालयाने हातमाग कापडाच्या खरेदीसाठी परस्पर सचिव वस्त्रोद्योग विभाग यांचेकडे कापडाची मागणी नोंदवावी. वस्त्रोद्योग विभागाने महासंघ (महाटेक्स)/ महामंडळाच्या पुरवठा क्षमतेच्या मर्यादेत व उत्पादन क्षमता विचारात घेऊन पुरवठा आदेश द्यावेत. सदर उत्पादन महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ (महाटेक्स)/ महामंडळाच्या उत्पादन केंद्राकडून उत्पादित झालेले आहे असे प्रमाणित करावे.

महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ (महाटेक्स)/ महामंडळ यांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था / सभासद किंवा महासंघ (महाटेक्स)/ महामंडळाने स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा. त्यांनी बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये.

सदर दरनिश्चितीची विधिग्राह्यता दि.३०/०४/२०१९ पर्यंत राहील. हातमाग कापड या बाबी अंतर्गत ज्या वस्तू / बाबीसाठी वस्तू व सेवा कर (GST) लागू असेल, अशा बाबींकरीता GST हा परिशिष्ट 'अ ' मध्ये नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहेत.

**पुरवठा कालावधी** :- पुरवठा आदेश / मागणीपत्र मिळाल्यापासून ६ आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी**:- मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरिक्षण करावे. निरिक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा / त्रुटी / दोष ताबडतोब महासंघ (महाटेक्स)/महामंडळाच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरिक्षण व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९० % रक्कम २ आठवडयामध्ये संस्थांना द्यावी व उर्वरित१०% रक्कम सर्व मालाची पोच पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत अदा करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतींच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालचा / वस्तूंचा दर्जा व गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने करावी.

सदर दरनिश्चितीस खालील अटी लागू राहतील.

१) सन२०१८-१९ साठी ज्या विनिर्देशच्या (Specifications) वस्तू हातमाग महासंघ (महाटेक्स)/ महामंडळ यांना दरनिश्चिती करुन देण्यात आले आहे. त्या विनिर्देशच्या (Specifications) वस्तू खरेदीदार विभागाला पुरविण्याची जबाबदारी हातमाग महासंघ (महाटेक्स)/ महामंडळ यांची राहील.

२) सदरच्या वस्तू केंद्र शासनाच्या हातमाग आरक्षण कायदा, १९८५ व त्यापुढील सुधारणा दि.२६ जुलै १९९६ मधील तरतुदीनुसार असल्याची जबाबदारी हातमाग महासंघ (महाटेक्स)/ महामंडळ यांची राहील.

३) महासंघ (महाटेक्स)/ महामंडळ यांनी शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठ्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

प्रति,

१) महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या. दि पंतनगर गार्डन व्हयू को.-ऑप हौसिंग सोसायटी लि. "शशांक" २२५/५९५८, पंतनगर, घाटकोपर (पूर्व),मुंबई-४०० ०७५.

२) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, एम.एच.एच.सी.कॉम्प्लेक्स, उमरेर रोड, नागपूर.

३) उप सचिव (उद्योग-४), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

४) उप सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

५) सह सचिव, वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

## परिशिष्ट "अ"

### सन २०१८-१९ वर्षासाठी "हातमागाचे कापडाच्या वस्तू" या बाबीची दरनिश्चिती.

(सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता दि.३०/०४/२०१९ पर्यंत राहील.)

| अ. क्र. | कापडाचा प्रकार | रुंदी इंचात | वार्प | वेफ्ट | रिड | पिक्स | सन २०१८-१९ वर्षासाठी निश्चित केलेले दर (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | **कॉटन साडी** | | | | | | **प्रती मीटर** |
| | अ) लाल, निळी, हिरवी | ४८ | ८० | ८० | ७२ | ६२ | ४३.०० |
| | ब) रंगीत किनार | ४८ | ८० | ८० | ७२ | ६२ | ४७.०० |
| | क) कोटा दोरीया | ४८ | ८० | ८० | ७२ | ७२ | ६२.०० |
| | ड) फिकट निळा | ४८ | ८० | ८० | ७२ | ७२ | ५३.०० |
| | ई) नेव्ही ब्ल्यू | ४८ | ८० | ८० | ७२ | ६२ | ५०.०० |
| २. | **टॉवेल** | | | | | | **प्रती.चौ.मी.** |
| | अ) हनिकोम / हक ए बॅक / स्ट्राईप व चेक्स | | २/१७ | १० | ४० | ३४ | ५५.०० |
| | ब) हनिकोम / हक ए बॅक / स्ट्राईप व चेक्स | | २/१७ | २/१७ | ४० | ३४ | ५०.०० |
| ३. | **बेडशिट** | | | | | | **प्रती.चौ.मी.** |
| | अ) डिझाइन/विणलेले अ-१ | | २/१७ | १० | ७२ | ३० (२प्लॉय) | ९६.०० |
| | ब) प्लेन/स्ट्राईप/चेक्स ब-२ | | २/१७ | १० | ३६ | ३४ | ५१.०० |
| | क) प्लेन/स्ट्राईप/चेक्स क-३ | | २/१७ | २/१७ | ४० | ३६ | ५७.०० |
| | ड) ब्लीच | | २० | २० | ५२ | ४८ | ६९.०० |
| | इ) रंगीत | | २० | २० | ५२ | ४८ | ७५.०० |
| ४. | **फर्निशिग टेपेस्ट्री** | | | | | | **प्रती.चौ.मी.** |
| | फर्निशिग टेपेस्ट्री | | २/१७ | १० | ३६ | ३४ | ६८.०० |
| ५. | **दरी / डयुरेट** | | | | | | **प्रती.चौ.मी.** |
| | अ) दरी पंजा | | २/६ | २/६ | १४ | ५२ | १६२.०० |
| | ब) दरी पंजा | | २/१७ | ६/२/६ | १४ | ५२ | ११९.०० |
| | क) दरी पंजा | | २/१७ | ६ | २८ | ६८ | १२४.०० |
| | ड) बस्कर पट्टी कापड | | २/१७ | ६ | ४० | ९ (८ प्लॉय) | १४९.०० |
| | इ) सतरंजी | | २/१७ | ६ | २८ | ६८ | ८९.०० |
| ६. | **ड्रेस मटेरियल** | | | | | | **प्रती मीटर** |
| | अ) कॉटन कोर्स | ३६ | २० | २० | ४८ | ४४ | ३८.०० |
| | ब) रंगीत पॉपलीन | ३६ | २/४० | २० | ५२ | ४४ | ५२.०० |
| | क) ब्लीच पॉपलीन | ३६ | २/४० | २० | ५२ | ४४ | ४७.०० |

| अ. क्र. | कापडाचा प्रकार | रुंदी इंचात | वार्प | वेफ्ट | रिड | पिक्स | सन २०१८-१९ वर्षासाठी निश्चित केलेले दर (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| ७. | **१) वूलन कपडा** | | | | | | |
| | वूलन कापड टवीड डाईड (आयएस ६७३:१९७३) | १४० से.मीं. | ३.२९ | ३.२९ | १२५ | ११० | २९७.०० **प्रती मीटर** |
| ८. | **बॅरेक कंबल** | | | | | | |
| | अ) बॅरेक कंबल - १ | १५० X २२५ | २.७ | २.७ | ८०/८० | ८० | ४६९.०० **प्रती नग** |
| | ब) बॅरेक कंबल - २ | १५० X २२५ | २.०० | २.०० | २६ | १४ | ५३०.०० **प्रती नग** |
| ९. | **चादर** | | | | | | **प्रती.चौ.मी.** |
| | अ) चादर -१ | | २/१७ | १० | ४० | ३४ | ८२.०० |
| | ब) चादर -२ | | २/१७ | २/१७ | ४० | २२ (२ प्लॉय) | ९२.०० |
| | क) चादर -३ | | २/१७ | १० | ७२ | ३० (२ प्लॉय) | १०३.०० |

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**